पणन विभागातील ०१ विधि अधिकारी (कंत्राटी) व ०२ सहायक विधि अधिकारी (कंत्राटी) अशा एकूण ०३ पदांचे परिश्रमिक अदा करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-०७२६/प्र.क्र.२७०/११-स

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १७ ऑगस्ट, २०२६.

<u>वाचा</u> :-
1. १) शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. कृबास २०२३/प्र.क्र.१२९/११-स, दि.१७ मे, २०२४.
2. २) शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. कृबास २०२४/प्र.क्र.२५०/११-स, दि.१८ फेब्रुवारी, २०२५.
3. ३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१० जून, २०२५.
4. ४) शासन निर्णय, सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. पुमाप्र-२०२५/प्र.क्र.३७०/११-स, दि.२३ मार्च, २०२६.

प्रस्तावना:-

मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिका क्र. ३०९४/२०२१ मध्ये दि.१२.०७.२०२३ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन वित्त विभागाकडे पणन विभागाने १ विधि अधिकारी व ३ सहायक विधी अधिकारी या काल्पनिक पदांची निर्मिती करण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. त्यास अनुसरुन वित्त विभागाच्या दि.०९ जून, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत उपसमितीने दिलेल्या मान्यतेनुसार पणन संचालनालय, पुणे यांच्या कार्यालयात १ विधी अधिकारी आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर व मंत्रालयीन स्तरावर प्रत्येकी १ असे ३ सहायक विधी अधिकारी अशी एकूण चार पदे बाह्ययंत्रणेद्वारे तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विभागाच्या संदर्भ क्र. १ येथील दि.१७ मे, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

पणन संचालक, पुणे यांनी विहित कार्यपद्धतीने जाहिरात देऊन छाननी अंती दि.१०.०४.२०२४ च्या पत्रान्वये ०१ विधी अधिकारी व ०३ सहायक विधी अधिकारी या पदांकरीता कंत्राटी पध्दतीने नियुक्तीसाठी शिफारस शासनास केली होती. सदर शिफारशीस शासन पत्र, दि.१६.०४.२०२४ अन्वये मान्यता दिली आहे.

सद्यस्थितीत पणन संचालक, पुणे यांच्या कार्यालयात ०१ विधी अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात ०१ सहायक विधी अधिकारी तसेच पणन उपविभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयात ०१ सहायक विधी अधिकारी कार्यरत आहेत. सदर अधिकाऱ्यांच्या मासिक पारिश्रमिकाच्या प्रयोजनार्थ सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात रु.२५.०० लाख इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. सदर अर्थसंकल्पीय तरतूदीतून ०१ विधि अधिकारी व ०२ सहायक विधि अधिकारी यांच्या मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करुन संदर्भ क्र. ३ येथील शासन निर्णयानुसार अनुज्ञेय परिश्रमिक देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मा.न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार कंत्राटी पद्धतीने भरण्यात आलेल्या ०१ विधी अधिकारी व ०२ सहायक विधि अधिकारी यांच्या नावासमोरील मासिक पारिश्रमिक व भत्त्याची रक्कम खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ. क्र.	**नाव**	**नियुक्तीचे पद व ठिकाण**	**मासिक परिश्रमिक + भत्ते**	**कालावधीकरता**	**मासिक परिश्रमिक + भत्त्याची मंजूर रक्कम**
१.	श्री.हेमंत यशवंत मेंडकी	विधी अधिकारी, पणन संचालनालय, पुणे	रु.१,०२,३००/-	दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०५.२०२६	रु.३,०६,९००/-
२.	श्री. हेमंत संजय अहिवळे	सहायक विधी अधिकारी, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, छत्रपती संभाजीनगर	रु.१,०३,२००/-		रु.३,०९,६००/-
३.	श्री.प्रमोद विठ्ठल ढोबळे	सहायक विधी अधिकारी, पणन उपविभाग,मंत्रालय, मुंबई	रु.७५,३७५/-		रु.२,२६,१२५/-
		एकूण			**रु.८,४२,६२५/-**

(अक्षरी रु. आठ लाख बेचाळीस हजार सहाशे पंचवीस)

२. उपरोक्त विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली ०१ विधि अधिकारी व ०२ सहायक विधि अधिकारी यांचे मासिका पारिश्रमिक व भत्त्यासाठी मंजूर रक्कम **रु.८,४२,६२५/-** (अक्षरी रु. आठ लाख बेचाळीस हजार सहाशे पंचवीस) इतकी रक्कम या शासन निर्णयान्वये पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मंजूर करण्यात येत आहे.

४. कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेले ०१ विधी अधिकारी व ०२ सहायक विधी अधिकारी यांचे पारिश्रमिक व भत्ते या विभागाच्या "मागणी क्र. व्ही-२, मुख्य लेखाशिर्ष-२४२५-सहकार, ००१, संचालन व प्रशासन, (०१) संचालन व प्रशासन, (०१) (०३), पणन संचालक (अनिवार्य) (२४२५ ००४९) मध्ये १०-कंत्राटी सेवा" या उद्दीष्टाखाली लेखाशिर्षातून सन २०२६-२७ वर्षीच्या उपलब्ध निधीमधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१७१२१८१६७५५६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUNIL BAJIRAO JAWALE

Digitally signed by SUNIL BAJIRAO JAWALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD,
2.5.4.20=262B3DA28B40E137B5C8D0A41FC101802FC0AA2E1E5F23BCD
D70B5F6F40BE381, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=55ED8236B174E909C03D22C74BDB638E5A729EA870A68
B20A5D5063848CF895A, cn=SUNIL BAJIRAO JAWALE
Date: 2026.08.17 12:19:12 +05'30'

(सुनिल जावळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
२. महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
३. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

४. अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अवर सचिव, कार्यासन १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
६. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/छत्रपती संभाजीनगर
७. निवडनस्ती.